**सोलापूर जनता सहकारी बँक लिमिटेड, सोलापूर**

**(मल्टी स्टेट शेडयूल्ड को-ऑप बँक)**

**“गगनभरारी” शिवस्मारक संकुल, गोल्ड फिंच पेठ, सोलापूर - ४१३००७**

**www.sjsbbank.com**

# पाहिजेत

सोलापूर जनता सहकारी बँक ही मल्टीस्टेट शेडयूल्ड सहकारी बँक आहे व बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र व कर्नाटक राज्य असून बँकेचे मुख्य कार्यालय, सोलापूर येथे आहे. बँकेचा शाखा विस्तार महाराष्ट्र राज्यामध्ये सोलापूर, लातूर, धाराशिव, छ.संभाजी नगर, बीड, नाशिक, मुंबई, पुणे, कोल्हापूर, नांदेड या जिल्ह्यात व कर्नाटक राज्यात विजयपूर येथे आहे.

बँकेत **“ट्रेनी क्लार्क”** या पदाच्या जागा भरण्यासाठी खालील पात्रधारकांकडून ऑनलाईन (Online) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर जागा महाराष्ट्रातील सोलापूर, लातूर, धाराशिव, छ.संभाजी नगर, बीड, नाशिक, मुंबई, पुणे, कोल्हापूर, नांदेड व कर्नाटकातील विजयपूर या शहरासाठी असून शाखा ठिकाणे वेबसाईट वर उपलब्ध आहेत.

निकष :-

१) वयोमर्यादा:- ३५ वर्षे ( दि. ३१/१२/२०२४ पर्यंत )

अ) मागासवर्गीयांसाठी ४० वर्षापर्यंत राहील

ब) बँकिंग व्यवसायातील किमान १० वर्षे अनुभव असल्यास वयोमर्यादा 40 वर्षापर्यंत राहील.

२) शैक्षणिक पात्रता:-

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची (१०+२+३ पॅटर्ननुसार) पदवी परिक्षा किमान ५०% गुणांसह उतीर्ण

ब) मराठी, हिंदी व इंग्रजी लिहिता, वाचता, बोलता तसेच विजयपुरा-कर्नाटक शाखेसाठी कानडी लिहिता, वाचता, बोलता येणे आवश्यक

क) संगणक साक्षरता आवश्यक (Word, Excel, Email व Typing)

३) अनुभव:- नागरी सहकारी बँक किंवा अन्य क्षेत्रातील बँकेतील किमान लिपिक किंवा समकक्ष पदावरील कामाच्या अनुभवास प्राधान्य.

४) अर्ज प्रस्तुती:- पात्र इच्छुक उमेदवारांनी जाहिरातीत नमूद केलेल्या तारखेपासून बँकेच्या वेबसाईट www.sjsbbank.com वर दिलेल्या लिंकनुसार (लिंक/ https://sjsbbank.com/View/Page/Careers) आवेदन पत्र ऑनलाईन भरून प्रस्तुत करावे, आवेदन पत्र भरत असताना जी माहिती अनिवार्य आहे, ती पूर्णपणे भरल्यानंतरच अर्ज संगणक प्रणालीतून स्वीकृत होईल. अर्जास संगणक प्रणालीकडून विशिष्ट क्रमांक दिला जाईल. त्या क्रमांकाचा उपयोग परीक्षा शुल्क भरण्यासाठी होणार आहे. उपरोक्तनुसार प्रस्तुत केलेल्या अर्जावर विहित केलेल्या जागेत उमेदवाराने स्वतःचा स्कॅन केलेला फोटो (पासपोर्ट साईज 3.5cm x 4.5cm) अपलोड करून अर्ज पूर्ण करावा.

५) परिक्षा शुल्क:- पात्र उमेदवारांनी परिक्षा शुल्क रुपये ७५०/- + GST १८% (एकूण ८८५/- भरावयाचे आहे.) सदरचे शुल्क पेमेंट गेट-वे चा उपयोग करून करावयाचे आहे. त्यासाठी संबंधित प्रणालीचे शुल्क अतिरिक्त असेल.

६) परिक्षा:- परिक्षा Computer Based Test (CBT-MCQ Type) पद्धतीने घेतली जाईल. सदर परिक्षा सोलापूर (महाराष्ट्र) शहरात निरनिराळ्या केंद्रावर आयोजित होईल. परिक्षेचा दिनांक, वेळ, केंद्राचे नाव व पत्ता इत्यादी बाबत उमेदवारांच्या हॉल तिकीटमध्ये उल्लेख केला जाईल. हॉल तिकीट बाबतच्या सूचना SMS/EMAIL द्वारा दिली जाईल, तसेच परिक्षेचे स्वरूप, माहितीपत्रक, फॉर्म भरण्याआधी Website वर उपलब्ध आहे

७) उपस्थिती खर्च:- परिक्षा व मुलाखत सोलापूर येथे होईल व उमेदवारांना स्व:खर्चाने येणे/जाणे करावे लागेल.

८) वेतनः- सदर पदासाठी बँकेच्या धोरणानुसार बँकेने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे वेतन देण्यात येईल. हंगामी (ट्रेनी / प्रोबेशन) कालावधीतील काम बँकेस समाधानकारक वाटल्यास आवश्यकतेनुसार पदे कायमस्वरूपी भरण्यात येतील. मात्र हे बँकेस बंधनकारक असणार नाही. या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार बँक स्वीकारणार नाही.

९) अन्य बाबी:- परिक्षा, व्यक्तिगत मुलाखत, अतिरिक्त शिक्षण, कामाचा अनुभव यांच्या गुणांकनाचे आधारे अंतिम यादी तयार केली जाईल. नियुक्त उमेदवारास / व्यक्तीस बँकेच्या कामाच्या सोयीच्या दृष्टीने बँकेच्या कोणत्याही शाखेत काम करावे लागेल.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने आवेदन पत्र प्रस्तुत करावे. यासाठी आवेदन पत्र दिनांक 13/12/2024 00:01 AM पासून दिनांक 31/12/2024 मध्यरात्री 23.59 PM पर्यंत प्रस्तुत करता येईल. वरील अटी व शर्तीमध्ये गरजेनुसार बदल करण्याचा अधिकार बँकेकडे राहील. उमेदवारांच्या निवडीचे परिक्षा प्रक्रियेमध्ये बदल करण्याचे अथवा सदर भरती प्रक्रिया काही अपरिहार्य कारणामुळे रद्द करण्याचे अधिकार बँकेकडे राहतील.

• उमेदवारांनी खोटी व चुकीची माहिती बँकेस कळविल्यास त्यांना या भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर (Stage) अपात्र ठरविण्यात येईल.

• अर्ज भरताना / दाखल करताना काही अडचण आल्यास दूरध्वनी क्रमांक 8956787043 वर संपर्क साधवा.